**नियमित दिवाणी दावा क्र.२९९/२०२५ मधील नि.१०४ खालील आदेश**
**दिलीप भोपते वगैरे वि. मा. जिल्हाधिकारी सो, सातारा वगैरे**
**CNR NO.MHST050004172025**

वादींनी सदरचा अर्ज दावा मिळकतीमध्ये जैसे थे (status quo) चा आदेश मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. सदरचा दावा वादींनी जाहीर ठराव व ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी याकामी हजर झालेले आहेत. प्रतिवादी क्र.५ ही कराड खरेदी विक्री सह. सोसायटी असून प्रतिवादीने बेकायदेशीरपणे वादीचे मिळकतीमध्ये वाढीव बांधकाम करणेचा प्रयत्न चालू केला. म्हणून वादीने सदर दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये नि.५ चा अर्ज दाखल होता. सदर अर्ज गुणदोषावर चालून नामंजूर करण्यात आला आहे.

०३. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचेत या अगोदर सुध्दा केसेस झाल्या असून मारामारी होणेची शक्यता आहे. प्रतिवादी हे वादीस मारहाण करुन वादीचे विरुध्द पोलिसांकडे ओळख असल्याने खोटया तक्रारी दाखल करत आहेत. वादी नि.५ चे आदेशाविरुध्द अपिल दाखल करणार आहेत. वादीचे जिवीतास धोका असून प्रतिवादी खोटया केसेस करत असल्याने वाद मिळकतीबाबत अपिल कालावधीपर्यंत जैसे थे (status quo) चा आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.५ व १० यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

०४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन करण्यात आले.

०५. दावा मिळकतीच्या मालमत्ता पत्रकी प्रतिवादी क्र.५ च्या नावाची नोंद असल्याचे

तसेच दावा मिळकतीपैकी ९३० चौ.फुट क्षेत्र वगळता उर्वरीत मिळकतीमध्ये प्रतिवादीचा कब्जा असल्याचे वादी यांना मान्य व कबुल आहे. सर्टिफिकेट ऑफ टेन्युअर अॅण्ड टायटल हे टाऊन प्लॅनिंग अधिका–यांनी २० जानेवारी १९६८ साली प्रतिवादी क्र.५ यांच्या नावे दिलेले आहे. या तारेखपासून प्रतिवादी क्र.५ हे दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीस आहेत. रे.दि.मु.नं.२०१/१९९० व रे.दि.मु.नं.४४३/१९९३ या दोन्ही दाव्यांमध्ये वादी यांनी वाद मिळकतीचे पश्चिम दक्षिण कोप–यातील ९३१ चौ.फुट जागा ही त्यांच्या मालकीची असल्याचे नमूद केले आहे. तसेच रे.दि.मु.नं.४४३/१९९३ मध्ये वर नमूद जागा वगळता उर्वरीत जागा ही प्रतिवादी यांच्या मालकीची आहे हे वादी यांनी नमूद केलेले आहे. प्रतिवादी यांनी बांधकाम करण्यापूर्वी नगरपालिकेची रितसर परवानगी घेवून बांधकाम सुरु केलेले आहे. सदरचे बांधकाम आजरोजी पूर्ण झाले असल्याचे प्रतिवादीचे वकीलांनी युक्तीवादामध्ये नमूद केलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता वाद मिळकत ही प्रतिवादी यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीस असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सन १९६७–६८ पासून दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.५ यांच्या कब्जेवहिवाटीस आहे व बांधकामही पूर्ण झालेले आहे. तसेच वादींचा नि.५ चा अर्ज गुणदोषावर निकाली झाला आहे तसेच दावा मिळकतीमध्ये बांधकाम पूर्ण झाले आहे. वरील सर्व कारणास्तव तसेच नि.५ चा अर्ज गुणदोषावर चालून नामंजूर झाला असल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होईल. उपरोक्त कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.10.09 11:06:11 +0530

ठिकाणः कराड ( जे.जे.माने )

दिनांकः ०८.१०.२०२५ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.